# औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
## महानगरपालिका, औरंगाबाद

जा.क्रं.मनपा/आरोग्य/एनएचएम/३१२/२०१८ दिनांक :-१३/०८/२०१८

प्रति,
ई-सिस्टीग मॅनेजर,
संगणक विभाग,
महानगरपालिका, औरंगाबाद

**विषय- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वाहन भाडे तत्त्वावर लावणे करिता दरपत्रक मागविणे बाबत संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बाबत.**

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत वाहन भाडे तत्वावर लावणे आहे.

सदरील वाहन हे इंडिका/इनोव्हा/स्विफट/ स्विपट डिझायर/स्कॉरपिओ/इंडिगो/ इत्यांदी सुस्थितीतील मेक मॉडेल एक (१) वाहन भाडे तत्त्वावर घ्यावयाचे आहे. सदरील वाहन तीन वर्षापेक्षा जुने असु नये. याकरिता नोंदणीकृत वाहनधारक/कंत्राटदार /एजन्सीकडून दरपत्रक मागविणे आहे.

करिता आपण महानगरपालिका औरंगाबाद या संकेत स्थळावर दरपत्रक सुचना प्रसिध्द करावे.

**दरपत्रक पाठविण्याचे ठिकाण:-**

१. डाटा सेंटर, सिटी मार्बल बिंल्डीग औरंगपूरा, औरंगाबाद

सदस्य सचिव
तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
## महानगरपालिका, औरंगाबाद

जा.क्रं.मनपा/आरोग्य/एनएचएम/१३९/२०१८ दिनांक :-१३/०८/२०१८

### खाजगी वाहन मासिक भाडेतत्वावर घेणेबाबतची
### दरपत्रक सुचना
### -:अल्प मुदतीची दरपत्रक सुचना:-

औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगरपालिका, औरंगाबाद अंतर्गत सीपीएमयु युनिट, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रमाकरिता इंडिका/इनोव्हा/स्विफट/ स्विपट डिझायर/स्कॉरपिओ/इंडिगो/ इत्यांदी सुस्थितीतील मेक मॉडेल एक (१) वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. सदरील वाहन ३ वर्षापेक्षा जुने असु नये. याकरिता नोंदणीकृत वाहनधारक/कंत्राटदार/एजन्सीकडून दरपत्रक पध्दतीने दि.२१/०८/२०१८ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत दरपत्रक मागविण्यात येत आहे.

आपले दरपत्रक मा.सदस्य सचिव तथा आरोग्य वैदयकीय अधिकारी, औरंगाबाद शहर आरोग्य समिती, महानगपालिका औरंगाबाद या नावे डाटा सेंटर (आरोग्य विभाग), सिटी मार्वल बिल्डीग औरंगपूरा येथे सादर करावे. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे, रदद करणे बाबतचे सर्व अधिकार राखून ठेवलेले आहे.

सदस्य सचिव
तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
## महानगरपालिका, औरंगाबाद

जा.क्रं.मनपा/आरोग्य/एनएचएम/७१२/२०१८ दिनांक :- १३/०८/२०१८

### :- निविदा सुचना:-

सदस्य सचिव तथा आरोग्य वैदयकीय अधिकारी, औरंगाबाद शहर आरोग्य समिती, मनपा, औरंगाबाद हे इनोव्हा, स्विफट डियाझर, स्कॉपिओ यापैकी एक वाहन कार्यालयाकरिता पुरवठा करणे करिता नोंदणीकृत क्षेत्रातील ठेकेदार/एजन्सी/पुरवठाधारकांकडून निविदा मागवित आहे.

| अ.क्र | तपशिल | |
|---|---|---|
| १ | वाहन | इनोव्हा, स्विफट डियाझर, स्कॉपिओ |
| २ | निविदा दाखल करण्याची दिनांक | दि. / /२०१८ ते दि. / /२०१८ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) |
| ३ | निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | दि. / /२०१८ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

### निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.

१. निविदाद्वारे **Air** Condition असलेल्या वाहनाची उपलब्ध करुन घ्यावे लागेल.

२. वाहन दररोज किमान १० तास व प्रतिमाह १८०० कि.मी. चालेल. तसेच अतिरिक्त कि.मी.चे दरपत्रक स्वतंत्रपणे देण्यात यावे.

३. इंधन व वंगण दुरुस्ती, वाहन चालकाचे वेतन, टोल भाडे इ.ची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल.

४. वाहन ३ वर्षापेक्षा जूने असून नये.

५. वाहनांची किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे, तसचे सदरहु वाहनाऐवजी पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही पुरवठाधारकाची राहील. यार्करिता अतिरिक्त दर प्रदान जाणार नाही.

६. वाहनाचा कोणत्याही प्रकारचा अपघात झाला तर तर त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकावर राहील. याकरिता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाकडून कोणत्याही प्रकारचा निधी मिळणार नाही.

७. भाडयाने दिलेले वाहन नादुरुस्त झाल्यास मालकाने पर्यायी वाहन उपलब्ध करुन न दिल्यास या कार्यालयाकडून दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन घेण्यात येऊन त्याचे भाडे संबंधित नादुरुस्त झालेल्या वाहनाच्या मालकाकडून मंजूर दराने जे प्रती दिवस दर देण्यात येईल त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे देयकातून भाडे कपात करण्यात येईल.

८. वाहनधारकाने प्रत्येक महिन्यात फिरती केलेल्या लॉगबुकची सत्यप्रत सदस्य सचिव तथा आरोग्य वैदयकीय अधिकारी, औरंगाबाद शहर आरोग्य समिती, मनपा, औरंगाबाद यांच्या स्वाक्षरीसह अहवाल सादर केल्याशिवाय भाडे अदा करण्यात येणार नाही.

९. शासकीय, निम शासकीय सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या नावावर वाहन असल्यास निविदा प्रक्रियेमध्ये त्यांच्या वाहनाचा विचार केला जाणार नाही.

१०. वाहन पुरवठादारास औरंगाबाद शहर आरोग्य समिती, मनपा, औरंगाबाद यांच्याशी करार करणे आवश्यक राहील.

११. वाहनचालकाकडे अधिकृत वाहन चालविण्याचा परवाना (Valid Motor License) असावा.

१२. वाहनावर राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा Logo असणे बंधनकारक आहे.

१३. सदर वाहन Tourist Vehicle म्हणून वापरण्यासाठी स्थानिक प्रादेशिक वाहतूक (Regional Transport Authority) परवाना असणे आवश्यक आहे.

१४. वाहन तसेच वाहन चालक वेळेवर उपलब्ध नसणे, वारंवार दुरुस्तीसाठी असणे, वाहन चालकाचे गैरवर्तन इ. कारणांसाठी दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१५. निविदा शर्ती व अटींचे पालन न केल्यास पुर्व सुचना न देता निविदा रदद करण्यात येईल.

निविदा भरण्यासाठी&dl:-

उपरोक्त अटी व शर्तीनुसार कार्यालयाकरिता वाहन उपलब्ध करुन घेणे करिता &

a अतांत्रिक असे दोन लिफाफा पध्दतीने निविदा भरण्यात याव्यात. प्राप्त निविदेनुसार प्रथम तांत्रिक निविदा उघडण्यात येईल व तांत्रिक निविदमध्ये अटी व शर्तीनुसार पात्र ठरलेल्या वाहनधारकांचे व्यवसायीक निविदा उघडण्यात येईल निविदेमध्ये खालील बाबीचा समावेश असणे आवश्यक आहे.

अ. तांत्रिक निविदा:-

१. फर्म/एजन्सीचे/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२. पत्ता
३. मोबाईल क्रमांक
४. एजन्सीचे नावाचे पॅन कार्ड सत्यप्रत
५. वाहन पुरवठा करण्याबाबत अनुभव प्रमाणपत्र
६. पुर्ण निविदा सर्व माहितीसह एजन्सीच्या अधिकृत व्यक्तीने शिक्का व स्वाक्षरी करावी
७. वाहनाची कागदपत्र, विमा प्रमाणपत्र

ब. व्यावसायिक निविद (अतांत्रिक) निविदा:-

१. यामध्ये (शेडुल -१ नुसार) दर कळविण्यात यावेत.

सदस्य सचिव
तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
औरंगाबाद शहर आरोग्य समिती,
महानगरपालिका, औरंगाबा

## Schedule - I

### व्यावसायिक दरपत्रक (Commercial Bid)

मी / आम्ही ------------------------------------------------------------ नोंदणीकृत एजन्सी / संस्था / कंत्राटदार दरपत्रकातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे अवलोकन केलेले असून त्या सर्व मला / आम्हाला मान्य असून मी / आम्ही इनोव्हा, स्विफ्ट डिझायर, स्कॉर्पिओ यापैकी एक वाहनाचा पुरवठा करण्यासाठी खालील प्रमाणे दर सादर करत आहे /आहोत.

| अ.क्रं. | तपशील | दर |
|---|---|---|
| 01 | इनोव्हा / स्विफ्ट डिझायर/ स्कॉर्पिओ यापैकी एक वाहनाचा पुरवठा करणे. | वाहन चालक, इंधनासह 1800 कि.मी., टोल चार्ज व भत्तासह रु.<br>(अक्षरी रुपये -------------------------------------<br>प्रतिमाह व त्यापुढील प्रति कि.मी करिता रु<br>(रुपये -----------------------------) इतके दर सादर करण्यात येत आहे. |

दिनांक :-

ठिकाण :-

स्वाक्षरी व शिक्का

एजन्सी